असा. क्र. ४१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, ऑगस्ट ११, २००५/श्रावण २०, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.**—वेतन प्रदान अधिनियम, १९३६, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . . . . | ४५१-४५२ |

दिनांक २२ जुलै २००५ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ११ ऑगस्ट २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### वेतन प्रदान अधिनियम, १९३६, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९३६ चा ४. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, वेतन प्रदान अधिनियम, १९३६, महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, वेतन प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००४ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९३६ चा अधिनियम क्र. ४ याच्या कलम १ ची सुधारणा.

२. वेतन प्रदान अधिनियम, १९३६, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १ मधील पोट-कलम (६) मध्ये , " एक हजार सहाशे रुपये " या मजकुराऐवजी " सहा हजार पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९३६ चा ४.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई